15

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये अहमदनगर येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F. 20046

श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक [illegible]-07-2017 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सही [signature]

सहाय्यक धर्मदाय आयुक्त

अहमदनगर विभाग अहमदनगर

अर्ज क्रमांक- 392

अर्जदाराचे नाव- विठ्ठल [illegible]

नकलेचा अर्ज आल्याचा दि. 10/2/2022

नकलेकरिता दिलेली रक्कम व दि. 11/2/2022

नक्कल तयार दि. 11/2/2022

नक्कल दिली तो दि. 11/2/2022

खरी प्रतिलिपी

अधिक्षक (प्र.) 11-2-2022

नक्कल तयार करणार-

रुजवात करणार-

खरी नक्कल म्हणून प्रमाणित

(प्र.) अधिक्षक 11-2-2022

अहमदनगर

अर्ज क्रमांक 891
अर्जदाराचे नाव विठ्ठल दरेकर
नक्कलेसाठी अर्ज आल्याचा दि. १०/२/२०२२
नक्कलेसाठी लागणारी रक्कम व दि. ११/२/२०२२
नक्कल तयार दि. ११/२/२०२२
नक्कल दिली तो दि. ११/२/२०२२



## परिशिष्ट ब

## ज्ञापन (विधानपत्र)

## मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई

1) संस्थेचे नाव :- मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई

2) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- द्वारा, मुळा एज्युकेशन सोसायटी, मि. नं. मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर

3) संस्थेचे उद्देश : संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे राहतील.

1) मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथून शिक्षण घेऊन गेलेल्या माजी विद्यार्थ्यांचे संघटन करणे.
2) मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील माजी विद्यार्थ्यांचा परस्पर संपर्क निर्माण करून त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा, व्यावसायिक कौशल्यांचा उपयोग करून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणे व त्याचा उपयोग युवा पिढीसाठी होणेकामी प्रयत्नशील राहणे.
3) मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा विकास करणे व कृतीशिल सहभाग घेणे.
3) अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती समाजापर्यंत पोहोचविणे.
4) सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून त्याद्वारे लोकजागृती, राष्ट्रीय प्रेम निर्माण करणे. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी सांस्कृतिक भवन चालविणे.
5) समाजसेवा शिबीर, रोजगार व व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम, लघुउदयोग प्रशिक्षण कार्यक्रम, जनजागरूकता कार्यक्रम, विविध शिबीरे, कार्यशाळा इ. कार्यक्रम राबविणे.
6) राष्ट्रीय सण, थोर नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, सार्वजनिक उत्सव साजरे करणे.
7) विविध खेळाच्या स्पर्धा भरवून युवकांमध्ये खिलाडुवृत्ती वाढीस लावणे.
8) महापुरूषांचे विचार समाजामध्ये रूजविण्यासाठी प्रवचन, प्रबोधनपर कार्यक्रम, व्याख्यान, शिबीरे, कार्यशाळा इ. चे आयोजन करणे.
9) सामाजिक भावना असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून गोर गरीब, अशिक्षित, मागासवर्गीय तथा दुर्बल घटकांसाठी सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविणे.
10) कौटुंबिक वाद, विद्यार्थ्यांना असलेल्या विविध संधी, सामाजिक, शैक्षणिक, कायदा इ. दैनंदिन तसेच विविध विषयांवर समुपदेशन कार्य चालविणे.
11) पर्यावरण, प्रदुषण इ. बाबत जनजागृती करणे, वृक्षारोपण करणे.
12) मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मधून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंम्मलने, मेळावे, चर्चासत्र, शिबीरे इ. चे आयोजन करणे.
13) ग्रंथालये व वाचनालय चालविणे.
14) अंधश्रध्देविषयक व लोकसंख्याविषयक लोकांचे मनामध्ये जागृती निर्माण होण्यासाठी परिसंवाद, चर्चासत्रे, मेळावे आयोजित करणे.
15) ग्रामीण तसेच शहरी भागाचा सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, आरोग्य इ. सर्व बाबतीत विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
16) विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या लोकांना, संस्थाना, गावांना बक्षीस, पुरस्कार, चषक, प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करणे.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

खरी नक्कल म्हणून प्रमाणित
11-2-2022
अधिक्षक (वर्ग)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहमदनगर विभाग, अहमदनगर
सहाय्यक धर्मादाय उप आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर

17) गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे.
18) माजी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग करून आजी विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणे.
19) पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट एक्झिबिशन इ. तांत्रिक स्पर्धा आयोजित करणे.
20) विविध ठिकाणी शैक्षणिक सहली आयोजित करणे.

4) मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेची व्यवस्था विहीत झालेली आहे. अशा संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासदांची नावे, पत्ते, वय, व्यवसाय, हुद्दा व धारण केलेले पद पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | पद | वय | व्यवसाय | नागरिकत्व |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे<br>लाख रोड, मुसमाडे वस्ती, मोरवाडी, मु. पो. देवळाली प्रवरा, ता. राहुरी, जि. अहमदनगर | अध्यक्ष | 28 | नोकरी | भारतीय |
| 2 | श्री. हरीदास श्रीरंग दरंदले<br>जुना वांबोरी रोड, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | उपाध्यक्ष | 40 | नोकरी | भारतीय |
| 3 | सौ. जयश्री प्रविण गडाख<br>लोहगांव रोड, गडाख मळा, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सचिव | 34 | नोकरी | भारतीय |
| 4 | श्री. महावीर रसिकलाल चोपडा<br>शिवाजी चौक, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | खजिनदार | 35 | किराणा व्यापार | भारतीय |
| 5 | श्री. बाबासाहेब पोपटराव जंगले<br>मु. पानेगांव, पो. करजगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 40 | शेती | भारतीय |
| 6 | श्री. सोपान एकनाथ झिने<br>मु. हिंगोणी, पो. कांगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 46 | नोकरी | भारतीय |
| 7 | श्री. परमानंद शेषराव जाधव<br>मु. शिरेगांव, पो. खेडले परमानंद, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 30 | नोकरी | भारतीय |
| 8 | श्री. बाळासाहेब जनार्दन सोनवणे<br>मु. पो. घोडेगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 47 | शेती | भारतीय |
| 9 | श्री. भारत परशूराम मोरे<br>मु. पो. मोरेचिंचोरे, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 45 | शेती | भारतीय |
| 10 | श्री. राजेंद्र रामकिसन शिंदे<br>मु. पानसवाडी, पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 34 | नोकरी | भारतीय |
| 11 | श्री. योगेश कचरू बानकर<br>मु. पो. शिंगणापूर, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 28 | शेती | भारतीय |

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | श्री. मल्हारी रामचंद्र वाघ<br>वाघ गल्ली, मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 34 | शेती | भारतीय |
| 13 | श्री. प्रसाद पंढरीनाथ बानकर<br>बानकर वस्ती, ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहमदनगर | सदस्य | 39 | नोकरी | भारतीय |
| 14 | श्री. प्रसाद ~~जालिंदर~~ विठ्ठल येळवंडे<br>मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 29 | नोकरी | भारतीय |
| 15 | श्री. रविकांत देविदास ससाणे<br>मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 37 | नोकरी | भारतीय |
| 16 | श्री. सुनिल नानासाहेब दरंदले<br>लांडेवाडी, मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 46 | शेती | भारतीय |
| 17 | श्री. रमेश ज्ञानदेव डोळे<br>मु. वंजारवाडी, पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | सदस्य | 37 | शेती | भारतीय |

5) आम्ही खाली सहया करणार मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई ही संस्था आज दिनांक 30/09/2016 रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये करण्यासाठी आम्ही या विधानावर सहया करत आहोत.

| अ. क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | सही |
|---|---|---|
| 1 | श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे<br>लाख रोड, मुसमाडे वस्ती, मोरवाडी, मु. पो. देवळाली प्रवरा, ता. राहुरी, जि. अहमदनगर | [signature] |
| 2 | श्री. हरीदास श्रीरंग दरंदले<br>जुना वांबोरी रोड, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | [signature] |
| 3 | सौ. जयश्री प्रविण गडाख<br>लोहगांव रोड, गडाख मळा, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | [signature] |
| 4 | श्री. महावीर रसिकलाल चोपडा<br>शिवाजी चौक, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | [signature] |
| 5 | श्री. बाबासाहेब पोपटराव जंगले<br>मु. पानेगांव, पो. करंजगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर | [signature] |

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

| | | |
|---|---|---|
| 6 | श्री. सोपान एकनाथ झिने<br>मु. हिंगोणी, पो. कांगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 7 | श्री. परमानंद शेषराव जाधव<br>मु. शिरेगांव, पो. खेडले परमानंद, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 8 | श्री. बाळासाहेब जनार्दन सोनवणे<br>मु. पो. घोडेगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 9 | श्री. भारत परशूराम मोरे<br>मु. पो. मोरेचिंचोरे, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 10 | श्री. राजेंद्र रामकिसन शिंदे<br>मु. पानसवाडी, पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 11 | श्री. येगेश कचरू बानकर<br>मु. पो. शिंगणापूर, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 12 | श्री. मल्हारी रामचंद्र वाघ<br>वाघ गल्ली, मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 13 | श्री. प्रसाद पंढरीनाथ बानकर<br>बानकर वस्ती, ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहमदनगर | |
| 14 | श्री. प्रसाद ~~जालिंदर~~ विठ्ठल येळवंडे<br>मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 15 | श्री. रविकांत देविदास ससाणे<br>मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 16 | श्री. सुनिल नानासाहेब दरंदले<br>लांडेवाडी, मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |
| 17 | श्री. रमेश ज्ञानदेव डोळे<br>मु. वंजारवाडी, पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर | |

स्थळ :- सोनई

दिनांक :- 30/09/2016

**ॲड. एस. डी. गायकवाड**
(बी.ए.एलएल.बी.)
मु.पो.[illegible], जि.अहमदनगर
**मो.नं.-९९२२९१२२०४, ९४०५००५५९२**

वरिल सहया करणा-यांना इसमांना मी ओळखतो, त्यांनी माझे समक्ष सहया केल्या आहेत.

वकिल, सही, पुर्ण नाव व शिक्का

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

## दाखला

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की, आमचे उत्तम माहिती, समजुतीप्रमाणे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर शी साम्य असलेली दुसरी कोणतीही संस्था आमचे भागात अथवा परीसरात अस्तित्वात नाही किंवा संस्था नोंदणी अधिनियम सन 1860 अन्वये नोंदविण्यात आलेली नाही.

स्थळ - सोनई

दिनांक - 30/09/2016

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

- परिशिष्ट 'क' -

- नियम व नियमावली -

# मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई मु. पो. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर

1) नियमावलीची संदर्भीय शब्दांची व्याख्या : -

संस्था म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई असे समजले जाईल.

अध्यक्ष म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल.

उपाध्यक्ष म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल.

सचिव म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे सचिव असे समजले जाईल.

खजिनदार म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे खजिनदार असे समजले जाईल.

कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभासद असे समजले जाईल.

सर्वसाधारण सभेचे सभासद म्हणजे मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई या संस्थेचे सर्वसाधारण सभेचे सभासद असे समजले जाईल.

2) कार्यक्षेत्र : - या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य या क्षेत्रापुरते मर्यादित राहील.

3) हिशोबाचे वर्ष :- या संस्थेचे हिशोबाचे वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

4) सभासद व त्यांची नोंदणी पध्दत : -

18 वर्षावरील वयाचे कोणत्याही व्यक्तीस संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल, त्याकरिता त्यांना संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल, आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतर सभासदत्वाची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्यांची नोंदणी संस्थेच्या सभासद यादीमध्ये करण्यात येईल.

5) सभासदांचे प्रकार : -

सभासदांचे दोन प्रकार राहतील.

1) आजीव सभासद - संस्थेला रू. 1001/- फक्त वर्गणी देणा-या व्यक्तीला आजीव सभासद म्हणून समजण्यात येईल.

2) साधारण सभासद - संस्थेला रू. 101/- फक्त वार्षिक वर्गणी देणा-या व्यक्तीला साधारण सभासद म्हणून समजण्यात येईल.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

6) <u>सभासदत्व रद्द होणे</u> : -
कोणताही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरला असेल, सभासद वर्गणी दिली नसेल, मरण पावला असेल, व्यसनी झाला असेल किंवा गैरवर्तन करीत असेल किंवा संस्थेला नुकसान पोहचवित असेल असे निदर्शनास आल्यास किंवा अन्य कारणावरून कार्यकारी मंडळाचे बहुमताने ठराव मंजुर करून काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजले जाईल.

7) <u>सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य</u> : -
सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजली जाईल. ही सभा वर्षातून एक वेळा तरी घेतली पाहिजे. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेउ शकतील कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, वार्षिक हिशेब मंजुर करणे, पुढील नवीन वर्षाचे अंदापत्रकाला मंजुरी देणे, आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे, कार्यकारी मंडळाची व पदाधिका-यांची निवड करणे, वेळेवर येणा-या ठरावावर निर्णय घेणे.

8) <u>सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या</u> : -
सर्वसाधारण सभेची सुचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ व सभेचे विषय नमुद असावे. सुचना सर्व सदस्यांना संस्थेच्या डाकबुकावर सही घेउन देता येईल. अगर टपालादवारे पाठविता येईल. सुचना सभेच्या पंधरा दिवस अगोदर पाठविणे आवश्यक राहील. सभेसाठी एकूण सभासदाच्या 2/3 उपस्थिती गणसंख्येस आवश्यक समजण्यात येईल.

9) <u>विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्य</u> : -
अशी सभा आवश्यकतेनुसार महत्वाच्या कामासाठी घेता येईल. जी कार्य सर्वसाधारण सभा करू शकते ती सर्व कार्य करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला राहील.

10) <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ पदाधिकारी यांची रचना</u> : -
संस्थेच्या कार्यकारी मंडळात कमीत कमी 17 व जास्तीत जास्त 21 पदाधिकारी असू शकतील त्यात पुढील पदाधिका-यांचा समावेश राहील. अध्यक्ष - एक, उपाध्यक्ष - एक, सचिव - एक, खजिनदार - एक, अन्य कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील.

11) <u>कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत</u> : -
कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील. निवडणुकीची पध्दत - गुप्त मतदान पध्दतीने सर्वसाधारण सभेत बहुमताने दर पाच वर्षानी निवडले जाईल.

12) <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांचे काम</u> : -
<u>अध्यक्ष</u> : सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवणे नोटीस काढून सभा आयोजित करणे रकमेची देवाण-घेवाण करणे वगैरे.

<u>उपाध्यक्ष</u> : अध्यक्षांचे गैरहजेरीत अध्यक्षांचे काम करणे अन्यथा अध्यक्षांना संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे.

<u>सचिव</u> : 1) संस्थेच्या सभा बोलाविणे. 2) संस्थेचा पत्रव्यवहार करणे. 3) तक्रारीचे निवारण करणे. 4) संस्थेच्या कर्मचा-यावर लक्ष ठेवणे. 5) किरकोळ नियम तयार करणे. 6) संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ते कोर्ट-कचेरीची कामे करणे. 7) वार्षिक हिशोबाची पत्रके तयार करून सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे. 8) रोजचे हिशेब पाहून त्यावर सहया करणे. 9) खर्चाची बिले मंजूर करणे. 10) संस्थेच्या वतीने रकमेची देवाण घेवाण करणे. 11) संस्थेच्या मालमत्तेची देखरेख करणे. 12) मंजुर झालेले ठराव अंमलात आणणे.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
| --- | --- | --- |
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

13) संस्थेच्या दृष्टीने हितावह असलेले इतर कोणतेही काम करणे. 14) कर्मचा-यांची नियुक्ती करणे. व त्यांच्यावर देखरेख ठेवणे.

सहसचिवः - सचिवांना संस्थेच्या कामामध्ये मदत करणे.

खजिनदार :- संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब लिहिणे अगर लिहून घेणे, हिशोब पूर्ण झाल्यावर कार्यकारी मंडळापुढे ठेवणे, हिशोबाचे पुस्तकातून वार्षिक पत्रके तयार करणे, रकमेची देवाणघेवाण करणे, ऑडीटर यांनी हिशोबातून काढलेल्या त्रुटीची पुर्तता करणे इ.

कार्यकारी मंडळाचे सभासद : कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे निवडणुकीच्या वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात मदत करणे इ.

इतर सभासद : सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे. निवडणुकीच्या वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

13) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा : -

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी तीन सभा दर चार महिन्यांनीं घेण्यात येतील. संस्थेच्या 2/3 सभासदांनी मागणी केल्यास अध्यक्षांनी किंवा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून 13 दिवसाचे आत बोलावण्याचे बंधन राहील. अशी सभा बोलावताना सूचनेत मागणीचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहील.

14) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या : -

कार्यकारी मंडळाची सभेची सुचना सात दिवस अगोदर देणे आवश्यक राहीलण्सुचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ ठिकाण व सभेचे विषय नमुद करणे आवश्यक राहील. सूचना संस्थेच्या डाकबुकावर सही घेऊन अथवा टपालादवारे पाठविता येईल कार्यकारी मंडळाचे 2/3 सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजले जाईल.

15) कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम : -

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरवेल त्याप्रमाणे राहतील. आजीव सभासदांमधून कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येईल. ज्या सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे अशा सभासदांना निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही व मतदान करण्याचा ही अधिकार राहणार नाही.

16) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत : -

कोणत्याही कारणास्तव कार्यकारी मंडळातील पद/पदे रिक्त झाल्यास कार्यकारी मंडळाच्या बहुमताने रिक्त पद / पदे उर्वरित कालावधी करिता भरता येईल. तसेच मतांची विभागणी समसमान झाल्यास एक जास्त मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

17) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य : -

कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवील. सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावाची पुर्तता करील आवश्यकतेनुसार त्यात बदल करू शकेल. तसेच वेळोवेळी माहिती घेऊ शकेल व कार्य समाप्तीनंतर उपसमिती रद्द करू शकेल. संस्थेच्या शाखा कार्यालयांना मान्यता देणे ती काढून घेणे. संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करणे, हिशोबावर नियंत्रण ठेवणे, तक्रारीची दखल घेणे, कार्यकारी मंडळाचे रिक्त स्थान भरणे, सेवकाची नियुक्ती करणे, बहुमताने मंजुर झालेला ठराव कायदेशीर करून अंमलात आणणे.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

18) संस्थेचा निधी व विनीयोग : -

सभासद फी, देणगी, वर्गणी, अनुदान हे संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील. संस्थेच्या उददेशपूर्तीकरीता निधी गोळा करता येईल व ती स्थावर स्वरूपाच्या मिळकतीसाठी गुंतविता येईल. अशा मिळकतीची नोंद पब्लीक ट्रस्ट रजिस्ट्रर मध्ये बदल अर्ज देउन करावी लागेल.

19) उददीष्ट निहाय खर्चाची तरतूद : - (टक्केवारी प्रमाणे)

ज्या उददेशाने रक्कम गोळा केली असेल त्या उद्‌देशावर ती रक्कम 100 टक्के खर्च करता येईल.

20) कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतुदी : -

संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून किंवा बॅकेकडून कर्ज किंवा ठेवी स्वीकारता येईल त्याकरिता मे. धर्मादाय सहआयुक्त पुणे यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

21) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबतची तरतूद : -

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणेचा अधिकार राहील. संस्थेला त्याकरिता कार्यकारी मंडळाची बहुमताने संमती घ्यावी लागेल. संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यापुर्वी मे. धर्मादाय सहआयुक्त पुणे यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

22) बॅक खाते : -

संस्थेजवळ असलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत किंवा मान्यता असलेल्या शेडयुल बॅकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. अध्यक्ष, सचिव वा खजिनदार या तीन पदाधिका-यापैकी कोणत्याही दोन पदाधिका-यांच्या संयुक्त सहीने रक्कम काढता येईल.

23) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत : -

1860 चे संस्था अधिनियमातील कलम 15 अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी 1971 संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 15 प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसुचीच्या नमुन्यात ठेवण्यात येईल. 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 - अ प्रमाणे 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 7 प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसुची एक च्या नमुन्यात आपले विभागाचे सहायक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 - अ प्रमाणे 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 8 प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लावलेल्या व्यक्तीच्या नोकरीसंबंधी अटीबाबतचे विवरण अनुसुची दोनच्या नमुन्यात आपले विभागाचे सहायक निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

24) नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतूद : -

संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या 2/3 बहुमताने ठराव मंजुर करून नियमावलीत बदल करता येईल. 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम 12 प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

25) संस्थेच्या नावात व उद्‌देशात बदल करण्याबाबतची तरतूद : -

संस्थेच्या नावात किंवा उददेशात बदल करावयाचा झाल्यास अथवा दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 12 अथवा 12 अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |

26) <u>विसर्जन</u> : -

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास 3/5 सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे घेणे व्यवहार पुर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुस-या संस्थेला दान म्हणून देता येईल 1860 चे संस्था नोंदणी अधिनियम चे कलम 13 व 14 प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

## - <u>दाखला</u> -

प्रमाणित करण्यात येते की, मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.क्र. | सभासदाचे पूर्ण नाव | पद | सही |
|---|---|---|---|
| 1 | श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | अध्यक्ष | (सही) |
| 2 | सौ. जयश्री प्रविण गडाख | सचिव | (सही) |
| 3 | श्री. महावीर रसिकलाल चोपडा | खजिनदार | (सही) |

स्थळ : - सोनई

दिनांक : - 30/09/2016

खरी प्रतिलिपी
11-2-2022
अधिक्षक (प्र.)
संस्था नोंदणी कार्यालय
...भाग, अहमदनगर

नक्कल तयार करनार-
तपासणी करणार-

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| श्री. जगदीश बाबासाहेब मुसमाडे | सौ. जयश्री प्रविण गडाख | श्री. महावीर रसिकलाल चोपडा |